रा.आ. पोदार वैद्यक महाविद्यालय, मुंबई
या महाविद्यालयाच्या आवारात असलेल्या
आयकेअर (Institute Of Contemporary
Ayurved Research and Education (I-CARE) या संस्थेला मान्यता देण्याबाबत...

**महाराष्ट्र शासन**
वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग,
शासन निर्णय क्र. एएमसी२००६/प्र.क्र.३४६/०६/शिक्षण-१
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२. दिनांक : एप्रिल, २००९

<u>प्रस्तावना</u>:- रा.आ. पोदार वैद्यक महाविद्यालय, मुंबई या महाविद्यालयाच्या आवारात असलेल्या Institute of Contemporary Ayurved Research and Education (I-CARE) या संस्थेची नोंदणी संस्था नोंदणी अधिनियम, १८६० आणि मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० अन्वये, अनुक्रमे दिनांक १४ नोव्हेंबर, २००२ आणि ११ ऑगस्ट, २००३ रोजी करण्यात आलेली आहे. जनसामान्यांमध्ये आयुर्वेदाबद्दल जागरुकता निर्माण करणे, आयुर्वेद पदवीधारकांसाठी राष्ट्रीय स्तरावर परिसंवाद व चर्चासत्रे आयोजित करणे आवश्यक आहे. तसेच आयुर्वेद पदवीधारकांसाठी त्यांचे ज्ञान अद्ययावत करण्याच्यादृष्टीने आयुर्वेदातील पंचकर्म व क्षारसुत्र विषयक प्रमाणपत्र अभ्यासक्रम चालविणे व त्यायोगे आयुर्वेदाचा प्रचार व प्रसार करणे इत्यादी उद्दीष्टे समोर ठेऊन सदर संस्थेची स्थापना करण्याबाबत संचालक, आयुर्वेद यांनी प्रस्ताव सादर केलेला आहे. सदर संस्थेला कार्योत्तर मंजूरी देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

<u>शासन निर्णय</u> - संचालक, आयुर्वेद संचालनालय, मुंबई यांनी सादर केलेल्या उपरोक्त प्रस्तावाचा सर्वांगीण विचार करुन शासनाची याद्वारे आय-केअर (Institute Of Contemporary Ayurved Research and Education (I-CARE) या संस्थेला खालीलप्रमाणे मान्यता देण्यात आहे.

१) पंचकर्म व क्षारसुत्र यामधील प्रमाणपत्र अभ्यासक्रम - कालावधी - एक महिना(प्रत्येकी)
२) पंचकर्म सहाय्यक यामधील प्रमाणपत्र अभ्यासक्रम - कालावधी - एक वर्ष
३) बेटर लिव्हिंग थ्रु आयुर्वेदा प्रमाणपत्र अभ्यासक्रम - कालावधी १५ दिवस



Scanned with CamScanner

४) I-CARE या संस्थेच्या कार्यकारी परिषदेने ठराव केल्याप्रमाणे सदर तीन अभ्यासक्रमाद्वारे प्राप्त होणा-या उत्पन्नातील ५० टक्के रक्कम अधिष्ठाता यांच्या स्वीय प्रपंची खात्यात जमा करण्यात यावी. सदर रक्कम रा.आ.पोदार वैद्यक महाविद्यालय व संलग्नित रुग्णालयातील शैक्षणिक व रुग्णालयीन सुविधा उपलब्ध करुन देण्यासाठी वापरण्यात यावी.

५) आयुर्वेदाचा प्रचार व प्रसार तसेच जनसामान्यामध्ये जागरुकता निर्माण करण्यासाठी व्याख्याने आयोजित करणे, आयुर्वेद पदवीधारकांसाठी राष्ट्रीय स्तरावर परीसंवाद व चर्चासत्रे आयोजित करण्यात यावीत.

६) अधिष्ठाता, रा.आ. पोदार वैद्यक महाविद्यालय, मुंबई आणि I-Care संस्था यांच्यात सामंजस्य करार (एम.ओ.यु.) करण्यात यावा.

७) सदर संस्थेने निश्चित केलेली उद्दीष्टे साध्य करण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करावा.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

(भूषण गगराणी)
सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति
संचालक, आयुर्वेद संचालनालय,
संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई,
कुलसचिव, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक
अधिष्ठाता, रा.आ. पोदार वैद्यक महाविद्यालय, मुंबई,
अधिष्ठाता, शासकीय आयुर्वेद महाविद्यालये, नागपूर, नांदेड, उस्मानाबाद,
मा. राज्यपालांचे सचिव, राजभवन, मुंबई
मा.मुख्यमंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई,
मा.उपमुख्यमंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई,
मा.मंत्री (वै.शि.) यांचे यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई,
मा.राज्यमंत्री (वै.शि.) यांचे यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई,
ग्रंथपाल, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, विधानभवन मुंबई,
सर्व मंत्रालयीन विभाग,
सर्व कार्यासने, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग,
निवडनस्ती.

Scanned with CamScanner